INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIAT

Impact Factor - 6.625

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2020 Special Issue – 217 (A)

## IMPACT OF VALUES BASED ON M.K.GANDHI, PT. J. NEHRU, DR. B. R. AMBEDKAR & DR. PANJABRAO DESHMUKH'S PHILOSOPHIES IN PRESENT SITUATION



Guest Editor:
Dr. Rameshwar M. Bhise,
Principal,
Shri Shivaji College of Arts, Commerce and Science,
Akola [M.S.] INDIA

Hon. Sheshraoji S. Khade,
Secretary,
Shri Shivaji Education Society, Amarawati

Chief Editor:
Dr. Dhanraj T. Dhangar

Executive Editor of the issue:
Dr. Jivan H. Pawar
Dr. A. S. Raut
Dr. G. V. Korape
Dr. Sanjay J. Tidke
Dr. Ananda B. Kale,
Dr. S. D. Thorat

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)

| | | |
|---|---|---|
| 33 | Impact of Philosophy of Dr. Ambedkar in Developing Democratic Values in India **Dipali Mankar** | 114 |
| 34 | Association of Fast Food and Soft Drink Consumption Health Status of IT Professionals **Dr Shreya Chauthaiwale, Sejal V. Lele** | 117 |
| 35 | Development Values through Basic Education (Nai Talim) **Dr. Nutan Chavan** | 125 |
| 36 | Contemporary Relevance of Rajashri Shahu Maharaj Thought's on Social Justice **Dr. Vishal Ovhal** | 128 |
| 37 | Sociological Study of Social Values Like Truth and Non-Violence of Mahatma Gandhi **Dr. Ananda Kale** | 136 |
| 38 | Value Oriented Education **Dr. Shubhangi Misal** | 139 |
| 39 | Value Education Through Indian Culture & Ethos **Dr. Mahendra Chhangani** | 142 |
| 40 | स्वातंत्र्योत्तर कालीन शैक्षणिक क्षेत्रातील विकास पुरुष डॉ. पंजाबराव देशमुख **डॉ. संगीता भुयार** | 146 |
| 41 | डॉ. पंजाबराव देशमुखांचे ग्रामीण विकास व लोक कल्याणाचे अर्थशास्त्र **डॉ. रामेश्वर भिसे व डॉ. प्राजक्ता पोहरे** | 149 |
| 42 | महात्मा गांधीजींच्या मानसशास्त्रीय विचारसरणीचा समाज मनावर झालेला परिणाम **कु. धनश्री टेकाडे** | 156 |
| 43 | आधुनिक काळामध्ये मूल्यशिक्षणाचे महत्त्व **प्रा. डी. बी. भारसाकडे** | 160 |
| 44 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक मूल्यांची प्रासंगिकता **डॉ. महेंद्र भगत** | 166 |
| 45 | लोकशाही शासन पद्धती व पंडित जवाहरलाल नेहरू **प्रा. औचीत्ये चार्ल्स** | 169 |
| 46 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सांस्कृतिक योगदान **प्रा. दिवाकर सदाशिव** | 173 |
| 47 | महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या तत्त्वज्ञानातील मूल्यांची साम्यता **डॉ. जयश्री देशमुख** | 177 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आधारित मूल्ये **डॉ. हेमलता भावसार व प्रा. सौ. कांचनमाला गवई (कांबळे)** | 181 |
| 49 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परिवर्तनवादी विचार **डॉ. एम. पी. खेडेकर** | 183 |
| 50 | अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रयत्न - एक दृष्टिक्षेप **डॉ. पी. आर. जुनघरे** | 187 |
| 51 | महात्मा गांधी आणि शिक्षण **डॉ. रावसाहेब ठोके** | 191 |
| 52 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार **डॉ. संतोष मिसाळ** | 196 |
| 53 | राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान **डॉ. सुरेश पंडीत** | 199 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundne Art's College
Gangakhed Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 217 (A)
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

# लोकशाही शासन पध्दती व पंडीत जवाहरलाल नेहरू

**प्रा. औचित्ये बेंजामिन चार्ल्स**
विभागप्रमुख (राज्यशास्त्र विभाग)
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड. जि. परभणी
मो. ९४२३१४३७७८
ईमेल – bawchite@gmail.com

**प्रस्तावना :–**

पंडीत जवाहरलाल नेहरू यांना आधूनिक भारताचे शिल्पकार म्हटले जाते. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान या नात्याने लोकशाही परंपरा नसणाऱ्या भारतात त्यांनी लोकशाही रूजविण्याचे अवघड कार्य केले. भयावह दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, प्रचंड सामाजिक व आर्थिक भेद असलेल्या विषम भारतीय समाजात धर्मनिरपेक्षता, समाजवाद, सहिष्णुता इ. मुल्यांनी युक्त राजकीय संस्कृती रूजविण्याचे महान कार्य त्यांनी केले. त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन इहवादी होता. तरीही धर्माचे सामाजिक मुल्य आणि सामर्थ्य त्यांना मान्य होते. मात्र धर्माचा ऐहिक जीवनाविषयीचा दृष्टीकोन त्यांना अमान्य होता. भारताचे आर्थिक व परराष्ट्र विषयक धोरण ही नेहरूंनी आपल्या देशास दिलेली देण आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. पंडित नेहरू यांच्यावर महात्मा गांधी यांचा प्रभाव होता. तरी परंतू आधूनिक भारताच्या उभारणीत त्यांनी गांधीजींच्या रामराज्याऐवजी पाश्चात्य पध्दतीच्या लोकशाहीचा स्विकार केला यावरून त्यांचा लोकशाही विषयीचा दृष्टीकोन स्पष्ट होतो.

**शोधनिबंधाचे महत्व :–**

आज लोकशाही हा शासन प्रकार लोकप्रिय शासन प्रकार आहे. जगात अनेक देशांनी या शासन पध्दतीचा स्वीकार केला आहे. तरी परंतू सर्वच देशांमध्ये हा शासन प्रकार यशस्वी ठरू शकला नाही. आपल्या शेजारील पाकिस्तान देशात लोकशाहीची झालेली शोकांतिका आपण पाहात आहोत. भारताला लोकशाहीची परंपरा नव्हती. अशा विषम परिस्थितीत त्यांनी लोकशाही यशस्वी करून दाखविली. पं. नेहरू यांच्या प्रयत्नानेच आपण लोकशाहीची फळे चाखत आहोत. आज स्वांतत्र्योत्तर काळात लोकशाहीवर अनेक संकटे येत आहेत. जातीय हिसांचार, राजकिय पक्ष व नेत्यांची धोरणे यामूळे लोकशाहीच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत पं. नेहरू यांच्या लोकशाही विषयक विचारांची गरज परत नव्याने निर्माण झालेली आहे. त्यामूळे पंडीत नेहरू यांच्या राजकीय विचारांस उजाळा देण्याचा हा नम्र प्रयत्न आहे.

**शोधनिबंधाची उद्दीष्टे :–**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी संशोधकाने पुढील उद्दीष्टे निश्चित केली आहेत.

१. पं. नेहरू यांच्या लोकशाही विषयक विचारांचा परिचय अभ्यासकास करून देणे.

२. विविधता असणाऱ्या भारत देशातील लोकशाहीच्या यशस्वीतेचा अभ्यास करणे.

३. भारतीय लोकशाहीच्या जडणघडणीत पं. नेहरू यांचे योगदान अभ्यासणे.

ISSN : 2348-7143
January-2020

**शोधनिबंधाची गृहितके :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने पुढील गृहीतके मांडली आहेत.

१. भारताला लोकशाहीची परंपरा नसतानाही पं. नेहरू यांच्या विचार व कार्यामुळे भारतात लोकशाही रूजली.
२. भारतीय लोकशाहीच्या जडणघडणीत पं. नेहरू यांचे योगदान महत्वाचे आहे.
३. वर्तमानकाळात लोकशाही संस्था व व्यक्ती स्वातंत्र्यावर होणारे हल्ले रोखण्यासाठी पं. नेहरू यांच्या लोकशाही विषयक विचारांची आज आवश्यकता आहे.
४. पं. नेहरूंवरमहात्मा गांधीच प्रभाव असतानाही भारताच्या उभारणीत त्यांनी गांधीजींच्या रामराज्याऐवजी पाश्चात्य पध्दतीच्या लोकशाहीचा स्विकार केला.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासीक व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, क्रमीक पुस्तके व वर्तमान पत्रातील लेख यांचा आधार घेण्यात आला आहे.

**पं. नेहरूंचा लोकशाही दृष्टीकोन :—**

पंडीत नेहरू लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. इंग्लडमध्ये असताना ते जॉन स्टुअर्ट मील यांच्या विचारांनी प्रभावीत झाले होते. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजहित यांच्यात सुसंवाद निर्माण करू शकणारी प्रणाली म्हणून ते लोकशाही कडे पाहतात.

युरोपातील नाझी व फॅसीस्ट हुकुमशाहीने जनतेचे केलेले शोषण त्यांनी पाहिले होते. तसेच रशियातील कम्युनिस्ट हुकुमशाही पण त्यांना ज्ञात होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात देशाची आर्थिक सत्ता मुठभर धनवानांच्या हाती होती. भारतीयांना हक्क स्वातंत्र्य नव्हते. याची प्रतिक्रीया म्हणून त्यांनी लोकशाहीचा स्वीकार केला. पंडीत नेहरूंचा लोकशाही दृष्टीकोन पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. व्यक्तिस्वातंत्र्य हा केंद्रबिंदू :—**

नेहरूंनी आपल्या लोकशाही विचारांत व्यक्ती स्वातंत्र्यस प्राधान्य दिले. व्यक्तिच्या क्षमतेवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. प्रत्येकास विकासाची संधी मिळावी व इतर मुलभूत सेवा सुविधा मिळाव्यात. शांततेच्या मार्गाने व्यक्तिविकास घडवून आणण्याचे स्वातंत्र्य याची संधी निर्माण करून देणे म्हणजे लोकशाहीचे तत्व होय. व्यक्ति स्वातंत्र्यास नेहरू लोकशाहीचा आत्मा समजत.

**२. परमत सहिष्णुतेचे समर्थन :—**

लोकशाहीत परमत सहिष्णुतेस महत्व असते. परमत सहिष्णुता याचा अर्थ इतरांच्या मताची कदर करणे होय. लोकशाहीत इतरांची मते जाणून ध्यावयास हवी. कोणताही निर्णय घेताना चर्चा करूनच घ्यावा. एकतर्फी निर्णय घेऊ नयेत. अशा प्रकारे नेहरू परमत सहिष्णुतेस लोकशाहीच्या यशासाठी प्राधान्य देतात.

**३. मुलभुत हक्कांस प्राधान्य :—**

हक्कांशिवाय व्यक्तिचा विकास होणे शक्य नाही. हक्क व कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजु होत. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी नागरिकांना मुलभुत हक्क असणे आवश्यक असते. म्हणूनच राज्यघटना तयार करत असताना त्यांनी राज्यघटनेत मुलभुत हक्कांचा समावेश केला.

४. समतेचा विचार :—

नेहरूंच्या मते लोकशाहीचा मुख्य आधार सामाजिक व आर्थिक समता हा आहे. सामाजिक संस्था व सामाजिक रूढी परंपरा व्यक्तिच्या विकासात अडथळे निर्माण करू शकतात. भारतीय जातीव्यवस्थेत तर लोकशाही व धर्मनिरपेक्षता दोन्ही निषेध आहेत. म्हणून त्या नष्ट झाल्या पाहिजेत असा विचार त्यांनी मांडला. धर्मातील उच्च आदर्श त्यांना मान्य होते परंतू धर्माच्या संकुचित व सांप्रदायिक अविष्कारास त्यांचा विरोध होता. धर्मसंस्था मानवास ऐहिक जीवनाबद्दल उदासीन होण्यात प्रवृत्त करते. याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली.

५. लोकशाही ही जीवनपध्दती होय :—

लोकशाही हा केवळ एक शासन प्रकार नव्हे तर ती जीवनपध्दती समजली जावी. ही जीवनपध्दती साकार होण्यासाठी जनतेच्या सार्वभौमत्वावर आणि व्यक्तिच्या समानतेच्या आधारावर उभारलेल्या राजकीय संयत्राबरोबरच विशिष्ट सामाजिक व आर्थिक परिवेशाची आवश्यकता असते असे ते म्हणतात. भारतास लोकशाहीची परंपरा नसल्यामूळे नेहरूंचे हे विचार महत्वाचे आहेत.

६. सांसदीय लोकशाहीचे समर्थन :—

संसदीय लोकशाहीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ एकमेकांशी निगडीत असल्यामूळे आपसुकच त्यांच्यात नियंत्रण व समतोल साधला जातो. संसद श्रेष्ठ असल्याने जनहीत साधले जाते. सांसदीय शासनपध्दतीमध्ये कोणताही उद्देश प्राप्त करताना शांततेच्या मार्गाचा स्विकार केला जातो व राजकीय हिंसाचारास आळा बसतो.

७. लोकशाही व समाजवाद यांचा समन्वय :—

भांडवलशाही समाजरचनेत सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण ठराविक व्यक्तिच्या हाती होते. तर साम्यवादी रचनेत श्रमीकांची व त्यातही साम्यवादी पक्षाची हुकुमशाही असते. या दोन्ही बाबी लक्षात घेऊन या दोन विचारसरणीतील सुवर्णमध्य साधत त्यांनी लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला. भारतातील मोठे उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे केले तर खासगी क्षेत्रासही काही प्रमाणात संधी दिली व मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. अनेक मोठया उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले व पंचवार्षीक योजनांचा स्वीकार करून नियोजनबध्द विकासाला सुरूवात केली.

८. राजकीय पक्षांना महत्व :—

लॉर्ड ब्राईस या विचारवंताच्या मते समुद्रावर लाटा जशा अपरिहार्य असतात तसेच लोकशाहीत राजकीय पक्ष हे अपरिहार्य असतात. हाच धागा धरून पंडित नेहरू यांनी लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राजकीय पक्षांना महत्वाचचे मानले आहे. राजकीय पक्षांमुळे लोकशाही गतीमान होते. राजकीय पक्षांनी जनतेचे राजकीय प्रबोधन करावे अशी अपेक्षा नेहरू व्यक्त करतात. वर्तमान काळातील राजकीय परिस्थिती पाहता नेहरूंचे हे विचार महत्वाचे वाटतात. आज राजकीय पक्ष हे लोकशाहीचे पहारेकरी आहेत की मारेकरी अशी शंका निर्माण होत आहे.

९. आर्थिक विषमता लोकशाहीस मारक :—

समाजिक विषमतेप्रमाणेच आर्थिक विषमता ही लोकशाहीस मारक आहे. असे नेहरूंना वाटते. ते लिहीतात, "लोकशाही व भांडवलशाही या परस्पर विरोधी गोष्टी आहेत. एकात सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण असते तर दुसरी सत्तेच्या केंद्रीकरणास कारणीभुत होते. भांडवलशाही व लोकशाही या परस्पर विरोधी असल्याने त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा आत्माच नष्ट होईल."

तेव्हा लोकशाही अर्थपूर्ण बनवायची असेल तर प्रथम आर्थिक विषमता नष्ट केली पाहिजे. आर्थिक लोकशाही वाचून राजकीय लोकशाही निरर्थक असते. केवळ मताचा समान अधिकार दिल्याने फारसा फरक पडत नाही. उपाशी माणसास मताधिकार व्यर्थ असतो. या सर्वांच्या मुळाशी खाजगी मालमत्ता कारणीभुत आहे. लोकशाही म्हणजे केवळ समान संधी नव्हे तर शोषणाचा अंतही यात अनुस्यूत आहे. वरील विवेचन पाहता लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आर्थिक विषमता नष्ट करणे गरजेचे आहे असे नेहरू प्रतिपादन करतात.

सारांश :–

भारतीय राजकारण, अर्थकारण व विशेषत: भारतीय लोकशाहीवर पंडीत नेहरू यांचा प्रभाव सर्वमान्य आहे. भारताच्या राष्ट्रीय चळवळीवर ज्याप्रमाणे महात्मा गांधी यांचा प्रभाव दिसतो तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या एकंदर जनजीवनावर नेहरूंचा प्रभाव दिसतो. पाश्चिमात्य लोकशाही संयत्र महात्मा गांधीना मान्य नव्हते. यात दोष असले तरीही तेच व्यवहार्य असल्याची खात्री पटल्याने नेहरूंनी ते भारतात राबविले. या लोकशाही संयत्रातील धर्मनिरपेक्षता व मानवी समानता ही दोन मुल्ये भारतीय समाज परंपरेशी विसंगत होती. तरी काही पातळयावर ती मुल्ये रूजविण्याचा नेहरूंनी आटोकाट प्रयत्न केला व त्यात ते बऱ्याच अंशी यशस्वी ठरले असे म्हणता येईल.

महात्मा गांधींचे श्रेष्ठतव त्यांना मान्य होते. मात्र ते गांधीचे अंध अनुयायी बनले नाहीत. अवजड यत्रांना विरोध व कुटीरेद्योगावर भर ही तत्त्वे नेहरूंना देशहिताची वाटली नाहीत. म्हणून राष्ट्रउभारणीत त्यांनी त्यांचा स्वीकार केलेला दिसत नाही. भारत देशास लोकशाहीची कोणतीही राजकीय परंपरा नसताना त्यांनी सामान्य जनतेस प्रौढ मताधिकार देऊन प्रजासत्ताकाचा स्वीकार केला व संसदीय लोकशाही सोबतच संघराज्य शासन पध्दती मान्य केली. स्वातंत्र्योत्तर काळात देशात अनेक क्षेत्रात विविधता असताना भारतीय लोकशाही आजपर्यंत अभंग राहीली याचे श्रेय पंडीत नेहरूंना देता येते. वर्तमान काळात भारतीय लोकशाहीस व धर्मनिरपेक्षतेस आव्हान देणाऱ्या अनेक घटना घडत आहेत. यांतून मार्ग काढण्यासाठी नेहरूंचे विचारच उपयुक्त ठरू शकतात असा आशावाद वाटतो. लोकशाही व समाजवाद यांच्यात समन्वय साधण्याचे महत्वाचे कार्य नेहरू यांनी केले आहे. नेहरू राष्ट्रवादी होते मात्र त्यांचा राष्ट्रवाद हा हिसंक व साम्राज्यवादी नव्हता. भारतात लोकशाही मुल्ये रूजविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. नेहरू ध्येयवादी होते, मुत्सद्दी राजकारणी होते. एक उत्तम लेखक, इतिहासतज्ञ, आदर्श प्रशासक, समाजवादी विचारांचे प्रवर्तक, शांतीदुत अशा अनेक पैलुंनी त्यांचे व्यक्तिमत्व नटलेले आहे. असा हा नेता भारताच्या भावी पिढयांना स्फुर्ती व मार्गदर्शन देत राहील.

संदर्भ :–

१. बिरादार दिगंबर, "पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत", क्रिऐटिव्ह पब्लिकेशन नांदेड, प्रथमावृत्ती २०११.
२. डोळे ना. य., "राजकीय विचारांचा इतिहास", कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९८६.
३. कळंबे दिनकर, "भारतीय राजकीय विचारवंत", कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००६.
४. शिंदे ज. रा., "भारत सोव्हियत मैत्रीचे तत्वज्ञान", सोव्हियत मित्र मुबंई, प्रथमावृत्ती १९८१.
५. शिंदे ज. रा., "भारतीय राजकीय विचारवंत", कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८६.
६. पं. नेहरू : (अनु.) साने गुरूजी, करंदीकर, "भारताचा शोध", कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती १९८६.
७. Counis, Talks with Nehru, London, 1957.
८. Jagat S. Singh (ed), Important Speeches of Nehru, Lahore. 1945.

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200

## Cotemporary Problems in India and Remidies

Guest Editor :
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

Associate Editors -
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's Colleg
Gangakhed Dist.Parbhani

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 101 | ग्रामीण महिला सक्षमीकरणात डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांचे योगदान | डॉ. कैलास ठोंबरे व डॉ.राजाभाऊ गायकवाड | 416 |
| 102 | वाढता दहशतवाद आणि [illegible]त | डॉ. केशव लहाने | 422 |
| 103 | जागतिक तापमान वाढ व भारताची राष्ट्रीय सुरक्षा | डॉ. किरण चक्रे | 427 |
| 104 | पर्यावरण प्रदूषण व उपाय | डॉ. राखी सलगर | 434 |
| 105 | शाश्वत विकास आणि भारतीय सद्यस्थिती | डॉ. रमेश वाघमारे | 438 |
| 106 | दहशतवाद : एक गंभीर समस्या | डॉ. साहेब राठोड | 442 |
| 107 | भारतासमोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य | डॉ. सिद्धेश्वर सटाले | 445 |
| 108 | दहशतवादाचे प्रकार : एक अभ्यास | डॉ. डी.एस.शिंदे | 448 |
| 109 | बेकारी : एक राष्ट्रीय समस्या | डॉ. शिवाजी चौगुले | 452 |
| 110 | समकालीन भारतीय अर्थकारण : समस्या आणि उपाययोजना | डॉ. शिवराज पाटील | 457 |
| 111 | दहशतवाद आणि समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. सुनिल जाधव | 460 |
| 112 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाय | डॉ. सुरेश सामाले | 463 |
| 113 | दारिद्र्य : देशाच्या विकासापुढील एक समस्या | डॉ. टी.आर.फिसफिसे | 468 |
| 114 | सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद | डॉ. सुनिता टेंगसे व गोपाळ गांगुर्डे | 473 |
| 115 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाययोजना | गौरव पाटील | 479 |
| 116 | मानवी जीवनावर होणारे पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम | डॉ. संदीपान गायके | 484 |
| 117 | भारतीय राजकारण आणि धर्म | डॉ. जे.एस.ढवळे | 487 |
| 118 | भारतातील सायबर गुन्हे : एक अवलोकन | डॉ. जयसिंग सिंगल | 489 |
| 119 | दारिद्र्याचे समाजशास्त्रीय अध्ययन : एक अभ्यास | दलित कांबळे व डॉ. दिपक धारवाडकर | 498 |
| 120 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | प्रा. नंदकुमार कुकलारे | 502 |
| 121 | नक्षलवाद : एक समाजशास्त्रीय आकलन | मीना राजपूत व डॉ. जी.एच.बानायत | 508 |
| 122 | कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ. जयदेव मोहिते | 513 |
| 123 | आदिवासी इतिहासलेखनातील डॉ. जिरेवाड सर यांचे योगदान | नितीन क्षीरसागर | 516 |
| 124 | इस्लामी व्याजपद्धती - अर्थशास्त्रीय अभ्यास | डॉ. सय्यद मुसा | 519 |
| 125 | भ्रष्टाचार- एक गंभीर समस्या | डॉ. अनंत नरवडे | 522 |
| 126 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य सामाजवादातील आर्थिक विचार | प्रा. वितेश निकते | 527 |
| 127 | भ्रष्टाचार आणि क्रीडा स्पर्धा | प्रा. भारत पल्लेवाड | 530 |
| 128 | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज | डॉ. किरण पिनाटे | 533 |
| 129 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय | प्रा. आर.एस.पोपळघट | 536 |
| 130 | भारतातील भ्रष्टाचाराची समस्या | प्रा. प्रकाश काळवणे | 541 |
| 131 | सायबर गुन्हेगारी एक सामाजिक समस्या | प्रा. एच.आर.खेत्री | 545 |
| 132 | बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. आर.बी.काळे व प्रा.जी.टी.मोकासरे | 548 |
| 133 | दहशदवाद : समकालीन प्रश्न आणि उपाय | डॉ. आर.के.काळे | 552 |
| 134 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील समस्यांचे चित्रण | प्रा. संदिप परदेशी | 559 |
| 135 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय | प्रा. इंदू साळुंके | 563 |
| 136 | रत्नागिरी जिल्ह्याचे उत्पन्न आणि दारिद्र्याचे स्वरूप | प्रा.एल.एस.सिताफुले | 568 |
| 137 | स्त्री शिक्षण समस्या व उपाय | प्रा. सीताराम मोगल, भागवत गोरे | 575 |
| 138 | भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड) | डॉ. दत्ता तंगवलवाड | 579 |


Principal
Late Sow Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज

**डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव**
लोकप्रशासन विभाग
कै.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे कला
महाविद्यालय,गंगाखेड

**प्रस्तावना :**

पर्यावरण म्हणजे सर्व सजीवांच्या जीवनावर परिणाम करणारी भोवतालची परिस्थिती निसर्ग ही ईश्वराने निर्माण केलेली अद्भुत गोष्ट आहे. या निसर्गामध्ये निसर्गतःच अस्तित्वात असलेल्या घटकांचा वापर आपण व इतर सजीव आपल्या पालन पोषणाकरिता असतात. पृथ्वीवर असणाऱ्या सर्व घटकांचा मानवी जीवनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या परिणाम होतो. त्यामुळेच सजीवांना त्यांच्या जीवन संघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घ्यावे लागते किंवा अनुकूल असे बदल आपल्यात करावे लागतात. जे सजीव आपल्यात बदल घडवून आणण्यात कमी पडतात किंवा काही कारणास्तव ते स्वतःमध्ये बदल घडवू शकत नाहीत त्यांना आपल्या प्राणास मुकावे लागते. कारण जो बदल स्वीकारतो तोच तेथे तग धरून राहू शकतो.पर्यावरण आणि मानव यांचे परस्पर संबंध नेहमी बदल असतात.

पृथ्वीवर सर्वात बुध्दिमान जर कोणी असेल तर तो मानव. त्यामुळे त्याने आपल्या बुध्दीमत्तेचा वापर करून पर्यावरणाकडून जसा पाहिजे तसा आपला विकास साधून घेतला. मात्र परतफेड करण्याचे साफ विसरला. एखादया व्यक्तीकडून का समजाकडून जेंव्हा आपण मदत घेतो तेंव्हा त्यांच्या प्रति नेहमी कृतज्ञ राहतो कधीही कृतघ्न होत नाही. हा नियम पर्यावरणाशी मानवाने कधीच पाळला नाही. त्यामुळे आज 'पर्यावरण वाचवा' यासारखे वाक्ये कानी पडत आहेत. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. पर्यावरण संरक्षण प्रत्येकाचे कर्तव्य आहे. पण आजच्या सध्याच्या परिस्थितीत मानव पर्यावरणाचा वापर आपल्याला हवा तसा करत आहे. परंतु पर्यावरण संरक्षणाकडे कोणीही लक्ष देत नाही. यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे देशात अनेक समस्या निर्माण होत आहे.जागतिक तापमानात वाढ,ओझोनचा क्षय,पर्यावरण प्रदूषण, आण्विक अपघात, आम्लपर्जन्य, हवामान बदल या समस्या पर्यावरणाच्या असंतुलनातून निर्माण होतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही काळाजी गरज आहे. म्हणून या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**उद्देश :-**

१. पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्व अभ्यासणे.

२. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

३. पर्यावरण संवर्धन करणे काळाची गरज आहे. याचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत लेखासाठी शास्त्रशुध्द अशा संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर लेख लिहिण्यासाठी लागणारी विविध प्रकारची माहिती प्राप्त करण्यासाठी दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा वापर करून माहिती संकलित करण्यात येणार आहे.

**पर्यावरण संवर्धन :-**

भारत एक सार्वभौम राष्ट्र झाल्यानंतर सुमारे ३३ कोटी देशवासीयांसाठी कृषी स्त्रोत आणि राष्ट्रीय पायाभूत सुविधा यांचा देशाला विकास करावा लागला.यासाठी विकासाची कास धरावी लागली. १९७० च्या दशकापर्यंत टिकाऊ

ISSN : 2348-7143
October-2019

विकास या संकल्पनेकडे जगाचे लक्ष वेधले गेले नव्हते. स्टॉकहोम येथे १९७२ साली झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेत यावर विचार केला गेला. जग आरोग्यपूर्ण आणि उत्पादन क्षम असणे हा मानवी हक्क आहे आणि तो मिळवण्यासाठी पर्यावरणाचे आणि जैव विविधतेचे जतन आणि संवर्धन केले गेले पाहिजे असा विचार या परिषदेत मांडला गेला. यावेळी भारतासह सर्व विकसनशील देशांनी सांगितले की देशाचा विकास ही त्यांची प्राथमिकता आहे आणि विकसित देशांनी आग्रह धरला की पर्यावरणाचे संरक्षण आणि जतन करणे हा जागतिक मंचावरील प्रमुख विषय असला पाहिजे.

व्यक्तीचा विकास हा अनेक घटकांनी होत असतो म्हणूनच प्राचीन काळापासून मानवाने पर्यावरणाचा स्वीकार केला. परंतु १५ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून विज्ञान व तंत्रज्ञानाची जसजशी प्रगती होत गेली तस तसा पर्यावरणाचा मोठया प्रमाणात ऱ्हास होत गेला आहे. मानव जसा-जसा बुध्दीमान होवू लागला तस-तसा निसर्गावर आपले वर्चस्व सिध्द करू लागला आणि आपले जीवन अधिक सुखमय आणि आरामदायी करण्यासाठी निसर्गाच्या मुळ व्यवस्थेत बदल घडवून आणू लागला म्हणजेच मानवाने आपले जीवन समृध्द करण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक साधनांचा वापर करून आपले जीवन सुसमृध्द करण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणात अनेक बदल केले. वाहतुकीसाठी रस्ते,राहण्यासाठी घरे, शेती,धरणे अशा अनेक घटकांची निर्मिती केली व करीत असुन या सर्व घटकांचा परिणाम पर्यावरणावर होताना दिसतो. पर्यावरणाचा दिवसेंदिवस होत जाणारा ऱ्हास व त्याचे सजीव सृष्टी व मानवी जीवनावर होणारे परिणाम आज आपल्याला अनुभवायला मिळतात.

आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता ही पूर्णपणे पर्यावरणातून होत असते. हे आपल्याला माहिती असूनसुध्दा पर्यावरण संवर्धनाकरिता आपल्याकडून कोणतेच प्रयत्न होताना दिसत नाहीत. उलट पर्यावरणामध्ये उपलब्ध घटकांचा वापर आपण आपल्या हव्यासापोटी करीत आहोत.मानवाच्या या स्वार्थीवृत्तीमुळे पर्यावरणाचे संतुलन मोठया प्रमाणावर बिघडत चालले असून त्यावाबत वेळीच जागरूकता न झाल्यास येणाऱ्या काळात गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल. यामध्ये कोणतेही दुमत नाही.सर्वप्रथम मी पर्यावरणाचा एक घटक आहे. यांचे भान प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे. ज्याप्रकारे कुटूंबातील प्रत्येक व्यक्ती कुटूंबाचा एक घटक असल्याचे भान ठेवून वागतो. त्यामुळेच त्या कुटूंबात सुख, समृध्दी व स्थिरता दिसून येते. कुटूंबातील एक जरी व्यक्ती बेजबाबदारीपणे वागला तर संपूर्ण कुटूंबाला त्याचे फळ भोगावे लागते. तसेच पर्यावरणाचे सुध्दा आहे. हे ध्यानात असू दयावे. पर्यावरणाचा ऱ्हास होण्यामागे वाढती लोकसंख्या हे एक प्रमुख कारण आहे. कुटूंबातील संख्या वाढू लागली की त्यांचे घरे वाढतात आणि घरे बांधण्यासाठी जमीन अधिग्रहण करणे व झाडे तोडणे कामप्राप्तच ठरते. त्यामुळे जंगल तोड होऊन मानवाची वस्ती वाढू लागते आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. त्यासाठी कुटूंब नियोजनासारख्या कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार अधिक वेगात करणे आवश्यक आहे.

आपण अन्नाशिवाय एखादा दिवस पाण्यावाचून एखादा तास जिवंत राहू शकतो. मात्र हवेतील ऑक्सिजन शिवाय क्षणभर सुध्दा जिवंत राहु शकत नाही आणि ऑक्सिजन निर्मितीचे सर्वात मोठे कार्य परिसरातील वृक्ष करीत असतात. वनस्पती स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात आणि हवेतील कार्बनडायऑक्साईड म्हणजे खराब हवा,वायू शोषून मानवास उपयुक्त असे ऑक्सिजन हवेत सोडतात. त्यामुळे वनस्पती व वृक्षांची लागवड व संवर्धन करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. जंगलतोड फार मोठया प्रमाणावर होताना दिसत आहे. जंगल वाचविण्यासाठी व लोकांमध्ये वृक्षाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी सुंदरलाल बहुगुणा यांनी 'चिपको आंदोलन' चालविले आणि त्यात यशस्वी सुध्दा झाले. वृक्षांचे महत्त्व अपरंपार आहे. हे आपले पूर्वजसुध्दा जाणून होते. संत तुकाराम महाराज याविषयी म्हणतात की 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे, पक्षी ही सुस्वरे आळविती' खरचं वृक्ष हे आपले सगे सोयरे, नातलग, मित्र परिवारातीलच नव्हे का? वृक्षांच्या महत्त्वाविषयी आपले पूर्वज संत,महात्मे आणि समाजसुधारकांनी ज्या बाबी सांगितल्या आहेत ते सामान्यांतल्या सामान्य लोकापर्यंत पोहोचविणे अत्यंत महत्वाचे आहे.

ISSN : 2348-7143
October-2019

आपला देश हा शेतीप्रधान देश आहे. येथील १/३ जनतेचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. अधिक उत्पन्न काढण्याच्या स्वार्थासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतीची जुनी पध्दत बंद केली असून रासायनिक औषध व खताचा बेसुमार वापर करीत आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस जमिनीचा कस कमी होतच आहे. शिवाय त्या रासायनिक घटकांचा प्रतिकूल परिणाम मानवाच्या आरोग्यावर होऊन हाती पोहोचत आहे. उत्पादन कमी निघाले तरी चालेल. परंतु रासायनिक औषध व खताचा अनावश्यक वापर टाळून सेंद्रिय खताचा वापर प्रत्येक शेतकऱ्यांनी कायला पाहिजे. सर्वच शेतकऱ्यांनी आपले आपले संघटन करून सेंद्रिय पध्दतीने शेती करण्याचे ठरविले तरच सर्वांना त्याचा फायदा होतो हे लक्षात घ्यावे.

नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये सौरऊर्जा हे कधीही न संपणारी संपत्ती आहे. भविष्यात सौर उर्जेच्या वापरात वाढ करणे म्हणजे एक प्रकारे पर्यावरणाला हातभार लावण्यासारखे आहे. पेट्रोल,डिझेल यासारख्या इंधनाचा मर्यादित साठा भविष्यकाळात संपण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा जपून वापर करण्यातच शहाणपणा आहे. सोबतच अमर्यादित अशा सौर ऊर्जेचा इंधनासाठी पर्याय म्हणून वापर करण्यासाठी सुरूवात केल्यास भविष्यातील अनेक संकटापासून मुक्तता मिळू शकेल. आज ज्या सौर ऊर्जेचा वापर कमी स्वरूपात आहे. म्हणजेच पूर्णपणे वाया जात आहे. त्याचा अनेक माध्यमातून विविध साधनांच्या मदतीने वापर करता येऊ शकतो आणि पर्यावरणाचा असमतोल थांबविता येऊ शकेल. सौरबंब,सौरचूल आणि सौर ऊर्जेवर चालणाऱ्या विविध उपकरणांचा जास्तीत जास्त वापर कसे करू शकतील? याविषयी शासनाने महत्वाचे फायदेशीर निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**सारांश :-**

पर्यावरणामध्ये उपलब्ध असलेल्या घटकांचा वापर मानवाने आपल्याबरोबरच इतर सजीव घटकांचा विचार करून केल्यास पर्यावरणाचा समतोल बिघडणार नाही व भविष्यात येणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना सामोरे जावे लागणार नाही परंतु सद्यस्थिती लक्षात घेता पर्यावरणीय समस्या दिवसें-दिवस वाढत असून त्यामध्ये मोठया प्रमाणावर हानी होताना दिसत आहे. पर्यावरणातील प्रत्येक सजीव घटकाचे संवर्धन करणे ही आपली एक सामाजिक जबाबदारी आहे हे विसरून चालणार नाही. जनजागृती म्हणून आपण प्रत्येकाने सहभागी होऊन अथवा पर्यावरण सामाजिक संस्थामध्ये सहभागी होऊन आपले कर्तव्य पार पाडल्यास पर्यावरणाचे संरक्षण होण्यास मदत होईल.

मानव इतर सजीवांपेक्षा बुध्दीमान असला तरी तो सुध्दा पर्यावरणाचाच एक घटक आहे. हे विसरता कामा नये नैसर्गिक पर्यावरणात बदल घडवण्याची क्षमता केवळ मानवाकडे आहे. त्यामुळे पर्यावरणातील प्रत्येक घटकांचे संरक्षण करणे त्याचा काळजीपूर्वक वापर करणे मानवाचे आद्यकर्तव्य आहे. आपण ओळखले पाहिजे व पर्यावरणाचे रक्षण म्हणून प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन करावे व इतरांनाही प्रोत्साहित करावे. पर्यावरण वाचवा ! जीवन वाचवा ! देश वाचवा ! या उक्तीप्रमाणे पर्यावरणाचे संवर्धन ही काळाजी गरज झाली आहे.

**संदर्भ सूची :-**

१. लोकप्रशासनातील नवप्रवाह- डॉ.एकंबेकर, प्रा.वाघमारे, प्रा.तरोडे.
२. पर्यावरण प्रबन्धन- मंजु सिंह-डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली-२०१७
३. पर्यावरण प्रदुषण-डॉ.प्रदिप कुमार-डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस-नई दिल्ली-२००७
४. लोकप्रशासनातील नवप्रवाह- डॉ.प्रीती पोहेकर अरूणा प्रकाशन-२०१०.
५. पर्यावरण अध्ययन-अमितकुमार-विश्वभारती प्रकाशन,नई दिल्ली-२०१६
६. योजना- मे-२०१९.
7. Mr.M.Wikipedia.org.
8. WWW.Saamana.com
9. WWW.Mahatb-com

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

February 2020 Special Issue- 22 Vol. 4

# The Role of Women in Global Development



Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr. Aqueela Syed Gous

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

३८. डिजीटल ग्रंथालय काळाची गरज — 107
श्री. सचिन भाऊराव काळे

39. आर्थिक विकासात शेतीची भूमिका — 110
प्रा. कल्याण सर्जेराव घोडके

४०. "पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचा मराठवाड्यातील कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम : एक अभ्यास" — 113
केंद्रे मनिषा धनराज

४१. भारतीय स्त्रियांची राजकीय व सामाजिक स्थिती — 116
माधव चांदु वाघमारे

४२. जागतिक विकासामध्ये कृषिक्षेत्रातील महिलांसाठी आसणाऱ्या शासकिय योजना — 118
मंदा काळुजी मस्के

४३. सर्वोच्च न्यायालयाची न्यायिक पुनर्विलोकनासंबंधी भूमिका — 121
माने परमेश्वर मुक्तीराम

44. भारतीय कृषी विकासात महिलांची भूमिका — 123
डॉ.मेघराज जनार्धन मोरे

45. मानव विकास — 125
प्रा.मुंडे एस.एम.

46. जलसंधारण मानवी अस्तित्वासाठी अत्यावश्यक — 127
डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव

४७. महिलांच्या सामाजिक समस्या आणि उपाययोजना — 129
डॉ. प्रमिला भगत

48. जलसिंचन काळाची गरज : एक अभ्यास — 132
प्रा.कावळे एस.टी. , प्रा.मोमले आर.जी.

49. बीड शहरातील मुस्लीम महिलांच्या आहार व आरोग्याची स्थिती — 135
सौ. सय्यद शाहीन शफी

५०. महिलांची स्थिती आणि सामाजिक समस्या — 137
सहा.प्रा.अतुल पी. राऊत

५१. भारतीय राष्ट्रीय चळवळ — 140
प्रा.चाटेनारायण संभाजीराव , प्रा. गायकवाड राहुल मारोतीराव

52. कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांवर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास — 142
सहा. प्रा. ज्ञानेश्वर सारंगधर गोरे

५३. महिलांच्या सामाजिक समस्यांचे प्रकार — 145
प्रा. गाडवे मनिषा महारुद्र

Principal
Late.Sow.Sheshabai College
Sitaram Mundhe Arts College
Gangakhed Dist.Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22, Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# जलसंधारण मानवी अस्तित्वासाठी अत्यावश्यक

**डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव**

लोकप्रशासन विभाग , के.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय,गंगाखेड

---

**प्रस्तावना :**

जीवावरणात पाणी हा मानवी जीवनात अत्यंत आवश्यक असा एक घटक आहे. पाणी हे मानवाच्या एकुणच प्रगतीचे व सुखसमृध्दीचे महत्वाचे साधन असून त्याचे सद्यस्थितीत नियोजन,व्यवस्थापन व संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे.पृथ्वी ग्रहावर पाण्याचे वितरण विषम स्वरूपाचे आहे. म्हणून पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. जगातील एकुण पाण्यांपैकी ९७% जल सागरात विशाल जलस्त्रोताच्या स्वरूपात आहे. त्याचप्रमाणे २.१ जल बर्फाच्या स्वरूपात तर उरलेले जल हवा,नाले,सरोवरे,तलाव,कालवे,भूमिगत जल अशा विविध जलसाठ्यामध्ये आढळते.परंतु अत्यल्प असे शुध्द जलदेखील मानवी हस्तक्षेपामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होत आहे.

सर्व वनस्पती प्राणी आणि मानवांना जीवंत राहण्यासाठी पाण्याची गरज आहे. परंतु मानव हा वनस्पती आणि प्राण्यांपेक्षा पाण्यावर अधिक अवलंबून असतो. स्वच्छ व शुध्द पाणी मानवी शरीरासाठी उपयोगी आहे. कारण पाण्यात तरलता व विद्रव्यताचे गुणधर्म आहेत. हे गुणधर्म पाचन,रक्त परिसंचरण आणि उत्सर्जन प्रक्रियेत उपयुक्त ठरतात. पाणी घामाच्या प्रक्रियेद्वारे आपल्या शरीराच्या तापमानाचे नियमन करण्यास देखील मदत करते. मानवाला पाणी इतर अनेक कारणांसाठी आवश्यक आहे. जसे घरगुती उपयोगाकरिता म्हणजेच पिण्यासाठी,स्वयंपाक करण्यासाठी,धुण्यासाठी पाण्याचा दररोज वापर केला जातो.सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेसाठी,दवाखाने हायस्कूल, पोहण्यासाठी, बगीचे, अग्निशामक दल,विविध खेळ खेळण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. शेती उत्पादन वाढवण्यासाठी जलसिंचन आवश्यक असते. शेती व्यवसायावर आधारित असे दुग्धव्यवसाय,पशुपालन,पशूंची निगा व स्वच्छता इ.शेतीशी निगडित अशा घटकांना पाणी आवश्यक असते. तरच शेती व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून एकुणच प्रत्येक शेतक-यांचे उत्पन्न वाढवून देशाचा विकास होऊ शकतो. औद्योगिकीकरणात ही पाण्याला अनन्य साधारण महत्व आहे. कारखान्यातील यंत्र चालविण्यासाठी, थंड करण्यासाठी विविध क्रिया प्रक्रिया करण्यासाठी, कारखान्यातील इतर सुविधांसाठी पाण्याचे योगदान महत्वाचे आहे.

**अभ्यासाचे महत्व :**

प्रदूषणकारी पाणी,जंगलतोड आणि जास्त लोकसंख्येमुळे जलचक्र देखील विचलित झाले आहे आणि या बदल्यात वार्षिक पाऊस आपल्या देशातील वेगवेगळ्या भागात सतत बदलत राहतो. पाणी व्यवस्थापित करण्यासाठी आणि वाचवण्यासाठी प्रयत्न न केल्यास आपल्यावर पाण्याचे तीव्र संकट उदभवू शकते. पाण्याचे जतन करणे म्हणजे पाण्याचा काळजीपूर्वक आणि आर्थिक वापर करणे. आपण पाण्याचे संवर्धन केले पाहिजे कारण ते एक मौल्यवान नैसर्गिक स्त्रोत आहे. ताजे,स्वच्छ पाणी हे मर्यादित स्त्रोत आहे. बहुतेक ग्रह पाण्याने व्यापलेले असले तरी ते मीठ पाणी आहे जे केवळ खाली घातल्यानंतर मानव आणि इतर प्रजाती पिऊ शकते. ही एक महाग प्रक्रिया आहे. दुष्काळ यासारख्या घटनांमुळे स्वच्छ आणि गोड्या पाण्याचा प्रवेश मर्यादित होतो म्हणजे लोकांना पाण्याचा वापर कमी करण्यासाठी आणि शक्य तितक्या पाण्याची बचत करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे. म्हणून जलसंधारणाच्या अभ्यासाचे महत्व आहे.

**अभ्यासाचे उद्देश :**

१. मानवी जीवनातील पाण्याचे महत्व अभ्यासणे.

२. जलप्रदूषणामुळे मानवी जीवनावर होणा-या परिणामांचा अभ्यास.

३. जलसंधारण ही काळाची गरज आहे. हे अभ्यासणे.

**जलप्रदूषण :**

पाण्याचे प्रदूषण म्हणजे जलाचे प्राकृतिक,रासायनिक व जैविक गुणधर्म बदलून त्याचा अत्यंत भयानक परिणाम मानव व त्याच्या जीवन पध्दतीवर होतो त्यास जलप्रदूषण असे म्हणतात. जलप्रदूषणाची तीव्रता व स्वरूप प्रामुख्याने सांडपाण्याने निर्माण होते. त्याचप्रमाणे पाण्याचा प्रवाह, जलावरणाची स्थिती,जलशुध्दीकरणाचे प्रयत्न, येथे जलप्रदूषण घडून येते.

**जल प्रदूषणाची उगमस्थाने :**

**१. नैसर्गिक :**

भूकंप,महापूर, वादळ,जमिनीची झीज होणे, जमिनीचा एखादा भाग खचणे,समुद्राचे किनारे व कड्याची झीज होणे,ज्वालामुखीचा उद्रेक, प्राणी व वनस्पतींचे कुजणे यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ही शुध्द जल प्रदूषित होत जाते.

**२. मानवी उगमस्थाने :**

नैसर्गिक उगमस्थापेक्षा मानवी उगमस्थाने जास्त प्रभावी आहेत. पृथ्वीवर सर्वाधिक भयानक असा परिणाम मानवी उगमस्थानांमुळे जलप्रदूषणावर झाला आहे. या उगमस्थानात औद्योगिक उगमस्थाने,नागरी उगमस्थाने,शेतकी उगमस्थाने सांस्कृतिक उगमस्थाने इत्यादींचा समावेश होतो. संस्कृतिक उगमस्थानात कुंभमेळा किंवा धार्मिक विधी की जे नदयांच्या काठी केले जातात. तसेच विविध रासायनिक खतांचा,कीटकनाशके, तृणनाशके इ.मुळे जल प्रदूषण निर्माण होते की ज्याचा उपयोग शेती व्यवसायात केला जातो. म्हणून जमिनीतून निर्माण



**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22, Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

होणा-या प्रत्येक खादयान्नात प्रदूषित जल आपणास आढळते. शेतीसाठी वापरलेली विविध रसायने पावसाच्या पाण्याबरोबर प्रवाहानुसार नद्या व सरोवरे यांना येऊन मिळतात व तेथील नद्या आणि सरोवरे प्रदूषित होतात. त्याचबरोबर प्रवाहित पाणी जेव्हा भूगर्भात झिरपत तेंव्हा भूमिगत जलही प्रदूषित होते. औदयोगिक भागातून वाहणारे प्रवाह,नदया सरोवरे, समुद्रकिनारे सुध्दा धनरूपातील व विघटित अशा रासायनिक प्रदूषकामुळे अनेक धातू संचयित होऊन प्रदूषित झाले आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर जलप्रदूषण घडून येते.

**जलप्रदूषणाचे परिणाम :**

१. माणसे टाईफाईड,कॉलरा,पेचिश,हेपेटायटीस,काविळ इत्यादी पाण्याद्वारे होणा-या विविध आजारांना बळी पडतात.

२. जलाशयात प्रदूषित पाणी असेल तर अशा भागात सूर्यकिरणे जलाच्या तळापर्यंत पोहोचत नाहीत म्हणून तेथे जलचर मरतात.

३. प्रदूषित पाण्यात सूर्यकिरणे खोलवर पोहोचत नाहीत. त्यामुळे पाण्याच्या पृष्ठभागाखाली असलेल्या वनस्पतींची प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते व
नंतर वनस्पती नाहीशा होतात.

४. प्रदूषित पाण्याचा वापर जलसिंचनासाठी अधिक प्रमाणात केल्यास जमीन खारट बनून ती प्रदूषित होते. ज्या भागात भूगर्भजल प्रदूषित असते अशा भागात ही समस्या भयानक स्वरूप धारण करते व मृदानापीक बनतात.

५. अति लोकसंख्येच्या प्रदेशात औद्योगिक विभागातून अनेक प्रकारची प्रदूषके पाण्याद्वारे कारखान्यांतून जलप्रवाहात सोडली जातात. अशी प्रदूषके
भूगर्भात पाण्याबरोबर झिरपतात व भूगर्भजल प्रदूषित झालेले दिसते.

६. ग्रामीण व रस्त्यांमध्ये सांडपाणी,मैलपाणी वाहून नेण्याची यंत्रणाच नसल्याने उघडी गटारे पिण्याच्या पाण्याचा व हवेला प्रदूषित करतात व अनारोग्याचे प्रमाण वाढते.

**पाण्याचा योग्य उपयोक करण्यासाठी उपाय :**

सध्याच्या आणि भविष्यातील पाण्याची गरज संतुलित करण्यासाठी जलसंधारण हा एक महत्वाचा दुवा आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे पाण्याचा योग्य उपयोग करावा.

१. पाण्याचा आवश्यकतेनुसार,उचित आणि बुध्दिमत्तापूर्ण उपयोग करावा. पाणी अत्यंत कमी आहे त्यामुळे उदयासाठी वाचवून ठेवले पाहिजे.

२. पाण्याला प्रदूषित करू नये. उद्योग व कारखान्यातून बाहेर येणा-या पाण्याला शुध्द करून बाहेर सोडावे. ज्यामूळे जलप्रदूषण होणार नाही. त्याचबरोबर विहिरी व अन्य ठिकाणे ज्यातून पाणी घेतले जाते ते ठिकाणे झाकून ठेवावेत.

३. पाण्याच योग्य असे संरक्षण करावे. ज्याठिकाणी पावसाचे पाणी टँकमध्ये भरून ठेवता येईल व त्याचा वर्षभर वापर करता येईल अशा ठिकाणी पाणी साठवन करावे.

४. पाण्याचा दुरूपयोग टाळावा. घरातील गळणारे नळाचे पाणी योग्य वेळी नळदुरूस्ती करून थांबवावे यामुळे पाणी वाचवता येईल.

५. पाणी हा विषय व्यक्तिगत समजू नये. कारण यावर फक्त आपल्या परिवाराचेच नव्हे तर संपूर्ण समाज व देशाचे हित-अहित अवलंबून आहे. राष्ट्रीय समस्या सोडवण्यासाठी सहभागी व्हावा.

नैसर्गिक रीत्या निर्माण झालेले शुध्द पाणी प्रदूषित होणार नाही याची आपण दक्षता घेतल पाहिजे. भारताचे जबाबदार नागरिक असल्याने आम्हाला पाणीटंचाईच्या सर्व समस्याविषयी माहिती असणे आवश्यक आहे. जेणेकरून आपण सर्व आश्वासने पूर्ण करू शकू आणि जलसंधारणासाठी पुढे जाऊ शकतो. हे खरे आहे की सर्व लोकांच्या छोटया प्रयत्नांमुळे मोठा परिणाम होऊ शकतो. जसे की ड्रॉप-डाऊन, एक तलाव, नदी आणि महासागर आपल्यासाठी बनू शकतो. आपल्याला जलसंधारणासाठी अतिरिक्त प्रयत्न करण्यासाठी गरज नाही. आपल्याकडे आपला दररोज आहे. प्रत्येक उपयोगानंतर नळ,कारंजे किंवा पाईपऐवजी बाल्टी धुण्यासाठी किंवा आंघोळीसाठी मग वापरण्यासारख्या क्रियांमध्ये काही सकारात्मक बदल करण्याची आवश्यकता आहे. लाखो लोकांच्या छोटया प्रयत्नामुळे जलसंधारण मोहिमेला मोठा सकारात्मक परिणाम मिळू शकेल.

देशातील सर्व लोकांना पाणी तेव्हाच मिळेल जेव्हा याचा उपयोग बुध्दीमत्तापूर्ण केला जाईल. व दुरूपयोग टाळला जाईल. नाहीतर शुध्दपाण्याचे वितरण हे पेट्रोल-डिझेल प्रमाणे पंपाने मोजून मिळू लागेल. काही लोकांद्वारे भविष्यवाणी केली जात आहे की "अगला विश्व युध्द कहीं पाणी पर ही न हो जाय."

**संदर्भ सूची :-**

१. पर्यावरण शिक्षा : डॉ.वीणा वाना व डॉ.राजीव वाना,रिसर्च पब्लिकेशन्स जयपूर

२. पर्यावरण अध्ययन : डॉ.मंजूसिंह,डिस्कव्हरी पब्लिशींग हाऊस नई दिल्ली,२०१३

३. पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन : डॉ.पी.ए.कदम, साधना पब्लिकेशन्स,परभणी.

४. योजना ३ २०१८

५. PS://WWW.toppr.com

६. WWWFastread.in

७. wordpress.com

८. w.thewaterpage.com




Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTM University jointly Organized

# One day Interdisciplinary National Conference on

## Contemporaneity of Gandhian Thoughts: Reality & Distortion

1st October, 2019



Organized By:
Department of Political Science
Shri Sharda Bhavan Education Society's
Rajiv Gandhi Mahavidyalaya,
Mudkhed, Dist. Nanded- Maharashtra -India

Edited by
Dr Ramesh Kadam
Dr Dattaji H. Mhetre

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

# अनुक्रमणिका

१. महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार- डॉ. विलास आघाव १

२. गांधीविचार : समज, गैरसमज आणि वस्तुस्थिती-प्रा.विठ्ठल दहिफळे ४

३. महात्मा गांधी आणि महिलाचे सबलीकरण-प्रा.डॉ.हिंगोले रेखा गंगाधरराव १०

४. गांधीजींचे ग्रामस्वराज्य-डॉ. वने रेखा रामनाथ १३

५. महात्मा गांधी : भारतीय संविधानाचे संकल्पक-प्रा.डॉ.प्रभाकर ग.जाधव १५

६. गांधीवाद व मार्क्सवाद-प्रा. डॉ. कारिकंटे जी.आर. १९

७. महात्मा गांधीजींचा अहिंसा विचार-प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार २३

८. महात्मा गांधीजींचे धर्मविषयक विचार-प्रा.साबदे राम पांडुरंग २५

९. महात्मा गांधीचे स्त्री-सबलीकरण विषयक विचार व कार्य-प्रा.डॉ.आर.बी.शेटे २७

१०. महात्मा गांधीजी एक अराज्यवादी विचारवंत-डॉ.पी.डी.सूर्यवंशी ३०

११. गांधी विचारांची प्रासंगिकता-प्रा.महीपाल सुळे ३२

१२. गांधीजीच्या विचाराची प्रस्तुतता-डॉ.माधव कदम ३४

१३. गांधीवादी अर्थशास्त्राची उपयुक्तता-प्रा.डॉ.हरिहर शिवदास मोहोकार ३६

१४. महात्मा गांधींचे पर्यावरण संरक्षण व संवर्धन विषयक विचार-प्रा.डॉ.नवनाथ गोविंदराव अडकिणे ३८

१५. महात्मा गांधी : हिंदू धर्म विषयक विचारांचे अर्थापनात्मक आकलन- डॉ. ए.टी. शिंदे ४४

१६. महात्मा गांधीजींचे सत्याग्रह संबंधीचे विचार- डॉ.शारदा गोविंदराव बंडे ४७

१७. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास-डॉ.महादेवी वैजनाथ फड ५०

१८. महात्मा गांधीजींचे राजकीय विचार- प्रा.डॉ.प्रमोद माधवराव आचेगावे ५३

१९. महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे तौलनिक विश्लेषण-डॉ.डोंगरे एल.बी. ५५

२०. महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार-डॉ.पी.एस.लोखंडे ५७

२१. महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार : एक चिकित्सक अभ्यास-प्रा.डॉ.कांबळे भरत मसाजी ५९

२२. आज भारताला नव्या गांधीची गरज-प्रा.पटवारी दयानंद शंकरअप्पा ६१

२३. महात्मा गांधीजींचे धर्म विषयक विचार -प्रा. डॉ. ए. टी. शिंदे, प्रा.डॉ.एम.एम.अनेराव ६३

२४. महात्मा गांधी आणि जागतिकीकरण-प्रा.डॉ.अमोलसिंह दशरथसिंह गौतम ६६

Principal
Late So... ...eshabai
Sitaran ... ...'s College
Gangakhed Dist.Parbhani

ISBN : 978-81-922248-8-6

# गांधीजीचे ग्रामस्वराज्य

डॉ. बने रेखा रामनाथ
सहायक प्राध्यापीका
राज्यशास्त्र विभाग
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंडे कला महाविद्यालय,
गंगाखेड

महात्मा गांधीनी भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत कार्यरत असताना भारतीय समाजजीवनाचे अतिशय सुक्ष्म निरिक्षण आणि अभ्यास केला. त्यातून त्यांना येथील प्रश्न आणि त्यासंदर्भातील उत्तरे सुचली ती वेळोवळी त्यांनी व्यक्त ही केली. भारतातील जवळपास 70 टक्के लोकसंख्या खेडयात वास्तव्य करते. किंबहुना "खरा भारत खेडयात राहतो म्हणून प्रत्येक खेडयाला एक आदर्श खेडे आणि एक परीपूर्ण स्वयंपूर्ण घटक बनविण्यासाठी त्यांनी ग्रामविकासाची संकल्पना प्रतिपादीत केली." आणि खेडयाकडे चला अशी हाक दिली. प्राचीन काळी खेडी स्वयंपूर्ण व समृध्द होती. मात्र काळाच्या ओघात ती भकास झाली. खेडयाकडे विकासाच्या बाबतीत दुर्लक्ष झाले. "खेडे स्वयंपूर्ण झाले असली पाहिजेत खेडयांना स्वायत्तता दिली पाहिजे" असे विचार मांडणाऱ्या गांधीजीच्या ग्रामस्वराज्याचा विचार स्थानिक शासनाचा तात्विक आधार राहिला आहे.

पंचायतराज संकल्पनेत त्यांनी ग्रामपंचायतीला गाव पातळीवरील भौतिक विकासाबरोबरच मानसिक, नैतिक व आध्यात्मिक विकासाचे केंद्र मानले होते. देशामध्ये लोकशाही व्यवस्था असावी. प्रत्येक व्यक्तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी परिपूर्ण अनुकुल वातावरण उपलब्ध व्हावे. सत्तेचे पुर्णत विकेंद्रीकरण व्हावे. परंतू हे सर्व खेडयाच्या उज्वल भवितव्यावरच आधारलेले असावे. असे स्पष्ट मत त्यांनी नोंदविले होते. प्रस्तूत शोधनिबंधात गांधीजीचे ग्रामस्वराज्य जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :–**

1. गांधीजीच्या ग्रामधारीत शासनव्यवस्थेचा अभ्यास करणे.
2. गांधीजीच्या ग्रामस्वराज्यावर आधारीत भारतातील पंचायतराजचा अभ्यास करणे.

**स[ं]शोधन पध्दती :–**

प्रस्तूत शोध निबंध वर्णनात्मक विश्लेषण पध्दतीवर आधारीत असून या अभ्यासात द्वितीय स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे. या अभ्यासाकरीता संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्र इत्यादीचा तथ्यसंकलनासाठी वापर करण्यात आला आहे.

पंचायतराज व्यवस्थेला महात्मा गांधीनी ग्रामस्वराज्य असे संबोधले होते. त्यांच्या मते "गाव एक प्रजातांत्रीक स्वयंभू राज्य असेल, ते इतर गावावर निर्भर असणार नाही." त्यांना स्वयंपुर्ण किंवा स्वावलंबी अशी गावे अभिप्रेत होती. गांधीजीच्या कल्पनेतील ग्रामराज्यात व्यक्ति हा राज्याचा केंद्रबिंदू होता. राज्याची रचना सागर वर्तुळाप्रमाणे असून त्या वर्तुळाचा मध्यबिंदू व्यक्ति असून ती खेडयासाठी आत्मसमर्पण करायला तयार असते. अशी खेडी स्वयंपूर्ण सहकार्याच्या बळावर आपल्या गरजा भागवू शकतील. त्यांना स्वताचे निर्णय घेण्याचे अधिकार असतील. वर्तुळाच्या बाहेरच्या टोकापासून ते थेट आपल्या केंद्रबिंदूपर्यंत सर्वजण सारखे असतील आणि सर्व खेडयाचे मिळून एकसंघ संघराज्य तयार होईल.

गांधीजीनी विकेंद्रीकरणाला आदर्श राज्याकडे घेवून जाणारा निकटचा मार्ग मानले. त्यांच्या मते "भारताचे दर्शन मुठभर शहरामध्ये नव्हे तर त्यांच्या आत असलेल्या खेडयामध्ये घडते." तेव्हा स्वातंत्र्याची वाटचाल तळाकडील घटकापासून व्हावी. याचाच अर्थ ग्रामपातळीवरील पंचायतीला पूर्ण अधिकार असतील. जणू काही त्या क्षेत्रापुरते ते एक गणराज्य असेल. गांधीजीनी स्वयंपूर्णतेवर भर दिलेला असला तरी शेजारी किंवा परकियांचे सहकार्य घेतले पाहिजे. त्यामूळे सुसंस्कृत समाज निर्माती होईल. अशा समाजात स्वतःच्या गरजाची जाणीव असेल. ते कोणत्याही वस्तूचा हव्यास न धरणारे लोक असतील. त्यांचा सत्य व अहिंसेवर अढळ विश्वास असेल.


ISBN : 978-81-922248-3-6
94

गांधीजीच्या स्वप्नातल्या भारतात शहरे महत्वाची नाहीत. खेडी महत्त्वाची आहेत. कारण शहरे ही आम्हाला परकीय सत्तेने बहाल केलेली गोष्ट आहे. शहरांचा सर्व व्यवहार हाच मुळात खेडयांच्या शोषणावर अवलंबून आहे. ही एक प्रकारची संघटीत हिंसा आहे. त्यातून अहिंसाप्रधान समाजाची व्यवस्था निर्माण होणार नाही. तेव्हा खेडयाचा पुर्ण कायापालट करून ती स्वंयपूर्ण करण्यातच भारताचा विकास अवलंबून आहे.

गांधीजीच्या रामराज्यात श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव असणार नाही. प्रत्येक खेडे स्वतःच्या गरजेपूरते अन्न व वस्त्र प्रावरणासाठी आवश्यकता असेल तेवढा कापूस पिकवेल. गावातच गुरांना चारण्यासाठी आवश्यक ती कुरणे असतील. गावात जो कसेल त्याची जमीन राहील व शेतीवर काम करणाऱ्या आणि भुमीला सुजलाम सुफलाम करणाऱ्या शेतकऱ्यांना सर्वात श्रेष्ठ स्थान दिले जाईल.

प्रत्येक गावाची पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था असेल, त्यासाठी असलेली तळी, विहिरी किंवा तलाव सर्वांसाठी खुले असतील. ग्राम सैनिकांचे एक संघटन असेल व ते गावाचे रक्षण करील. गावातल्या प्रत्येक तंटयाचा न्यायनिवाडा पाच पंच करतील. प्रत्येक गावात स्वतःचे नाटयगृह, शाळा, सभागृह व मुलांसाठी खेळाची मैदाने असतील. ज्या कलांना बाहेरच्या जगात मार्केट असेल त्या सर्व कला गावात विकसीत होतील. कवि, कलाकार, शिल्पकार, भाषापंडित, संशोधक सारे गावातलेच असतील व गावातच राहतील. सर्व जिवनोपयोगी वस्तू गावातच निर्माण होतील.

भारतीय खेडी स्वच्छ व कलापूर्ण राहतील. झोपडयांमध्ये भरपूर हवा व प्रकाश राहिल. प्रत्येक झोपडीला एक अंगण असेल. त्यात भाजीपाला पिकविला जाईल. धान्याप्रमाणे वस्त्र, भाज्या, फळे खेडे स्वतःच निर्माण करतील. ग्रामीण लोकांना काम मिळायला हवे. त्यामूळे यंत्राचा वापर कमीत कमी व मानवी श्रमाचा वापर अधिकात अधिक होईल. परीणामी सुदृढ व स्वावलंबी भारताची निर्मीती होईल.

महात्मा गांधीजीच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेप्रमाणे सरकारने धोरण निश्चितीला प्राधान्य देवून त्यावर आधारीत योजनांची अमलबजावणी केली तर वाढत्या लोकसंख्येमूळे शहरे बकाल आणि ग्रामीण भाग ओस पडणार नाहीत. गरीबातल्या गरीबाला सुध्दा भारत देश आपला वाटेल.तिथे प्रत्येक मताला महत्व राहिल आणि देशाच्या जडणघडणीत प्रतयेक जण सहभागी होईल. पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करून गांधीजीच्या स्वप्नातील भारत साकारण्याचा मार्ग शासनाने अनुसरलेला आहे. आता प्रश्न आहे पंचायतराजच्या वाटचालीतील प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी प्रामाणीकपणे व काटेकोरपणे पार पाडण्याची. 73 व्या घटनादुरूस्तीनुसार पंचायतराजला घटनात्मक दर्जा देवून गावाचे प्रश्न गावातील लोकांच्या साहयानेच सोडविण्यावर विशेष भर दिला आहे. 14 व्या वित आयोगाने तर ग्रामपंचायतीला प्रत्यक्ष वित्तीय अधिकार दिलेले आहेत. त्यामूळे ग्रामपंचायत विकासाला गती प्राप्त होवू शकते. तसेच ग्रामपंचायतीतील कामकाजाचा लेखाजोखा जनता मोबाईलमार्फत जाणून घेवू शकते. अशा पध्दतीने भारताच्या सत्ता विकेंद्रीकरणाची उभारणी ही गांधीजीच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेच्या उद्दिष्टावर अवलंबून आहे. तिची अमलबजावणी उद्दिष्टानुसार झाली तर स्वावलंबी व स्वयंपूर्ण भारत निर्माण होईल.

संदर्भ सूची :–

1. गांधी अनिता – पंचायती राज एवं महिला सशक्तीकरण, बुक एनक्लेव प्रकाशन, जयपूर, 2009
2. गांधी एम. के. – पंचायती राज, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, 1961
3. गांधी विचार:व्ह्व074द्ध – य.च.म.मु.वि. नाशिक
4. सावळे आर. डी. – भारतीय राजकीय विचारवंत, अमर प्रकाशन, नांदेड.



ISBN : 978-81-922246-8-6

95